Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

# शिष्यवृत्ती परीक्षेतील बुद्धीमत्ता विषयाच्या उपक्रमांच्या परिणामकारकतेचा अभ्यास

संशोधकाचे नाव
**श्री. योगेश नारायण कुलट**
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

मार्गदर्शकाचे नाव
**डॉ. संतोष रुकारी**
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

***सारांश :-***

***शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता वाढवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी शिष्यवृत्ती परीक्षा एक प्रभावी माध्यम आहे. महाराष्ट्र राज्यात पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी घेतली जाणारी शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्ता, शैक्षणिक क्षमतेचा आणि विश्लेषण कौशल्याचा सर्वांगीण अभ्यास करते. शिष्यवृत्ती परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देणारी एक महत्त्वाची परीक्षा आहे. ही परीक्षा केवळ शैक्षणिक गुणवत्ता तपासण्यासाठी नसून, त्यांच्यातील बौद्धिक क्षमता, तार्किक विचार व समस्यांचे विश्लेषण* करण्याची क्षमता ओळखण्यासाठी घेतली जाते. यामध्ये बुद्धिमत्ता चाचणीचा विषय खूप महत्त्वाचा मानला जातो. या विषयाच्या प्रभावी अध्यापनासाठी विविध उपक्रम राबवले जातात, जे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासात मोलाची भूमिका बजावतात.***

CC BY *Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's* licensed Based on a work at *http://www.goeiirj.com*

**महत्वाचे शब्द :-** 1) शिष्यवृत्ती परीक्षा 2)बुद्धिमत्ता 3)उपक्रम

**संशोधन लेखाचा मुख्य भाग :-**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी त्याच्या बुद्धिमत्तेचा वापर करून घेण्यासाठी त्याच्या बुद्धिमत्तेला योग्य वळण देण्यासाठी आणि एकूणच समाजातील राष्ट्राच्या विकासातील त्याचे योगदान समजून घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अनेक प्रकारच्या स्पर्धा परीक्षाचे आयोजन केलेले दिसते प्राथमिक स्तरावर नवोदय परीक्षा, मंथन परीक्षा, मॅथ ऑलिम्पियाड, सायन्स ऑलिम्पियाड ,शिष्यवृत्ती परीक्षा इत्यादी राबविल्या जातात शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना अनेक विषयांचा अभ्यास करावा लागत असतो त्यामध्ये प्राधान्याने मराठी भाषा इग्रजी, बुद्धिमत्ता, अंकगणित इत्यादी विषय असतात.

शिष्यवृत्ती परीक्षेतील बुद्धिमत्ता हा विषय विद्यार्थ्यांच्या आकलनाच्या दृष्टीने निश्चितच कठीण असला तरी देखील अशक्य मात्र नसतो आणि अशा विद्यार्थ्यांसाठी जर काही उपक्रम राबविले तर त्याचा निश्चितच परिणाम विद्यार्थ्यांवर होईल.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी व सद्यस्थिती :-**

बुद्धीमत्ता विषयाच्या बाबतीत विचार केल्यास केवळ गोंधळात टाकणाऱ्या प्रश्नापुरता हा विषय मर्यादित होता.पण आता काळ जसा बदलला तसे काळानुसार शिक्षणपद्धतीत जो बदल झाला त्या बदलामुळे या विषयात विविध उपक्रमांची अंमलबजावणी होऊ लागली.यात ज्ञानरचनावादी शिक्षण,ग्रुप ॲक्टिव्हिटी, तर्कशक्ती वाढवणारे उपक्रम समाविष्ट आहेत.

शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थ्यांची सर्वांगीण बुद्धीमत्ता तपासण्यासाठी 1980 नंतर बुद्धीमत्ता विषयाचा समावेश करण्यात आला.पूर्वीच्या काळी या परीक्षेत केवळ भाषा व गणित या विषयांवर भर दिला जात असे.1954 पासून महाराष्ट्रात शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन केले जाते.तेव्हापासून 1980 पर्यंत भाषा व गणिताला प्राधान्य होते,परंतु 1980 नंतर बुद्धीमत्ता या विषयाचे महत्त्व ओळखून स्वतंत्र विषय म्हणून याचा समावेश शिष्यवृत्ती परीक्षेत करण्यात आला. त्यानंतर प्रश्नपत्रिका ही मुख्यतः निरीक्षण,वर्गीकरण,प्रतिमा ओळखणे व तर्कशक्तीवर आधरित बनवण्यात आल्या.

पूर्वीच्या काळी बुद्धीमत्ता विषय शिकवण्याची पद्धत ठरलेली नव्हती.शिक्षकांकडे साधन सामग्री कमी होती,त्यामुळे विद्यार्थ्यांना बुद्धीमत्ता विषयाची तयारी करताना अडचणी येत असत पण कालांतराने शिक्षणतज्ञ, राज्य मंडळ व शाळांनी या विषयासाठी उपयुक्त उपक्रमांची आखणी सुरू केली.

**सद्यस्थिती :-**

आज शिष्यवृत्ती परीक्षेला संपूर्ण राज्यभरात खूप महत्त्व दिलं जातं.त्यामुळे पालक,शिक्षक व शाळा यांचं लक्ष या परीक्षेतील तयारीकडे केंद्रित झाले आहे. या परीक्षेत एकूण 300 गुणांपैकी 100 गुण हे एकट्या बुद्धीमत्ता विषयाला देण्यात आलेलआहेत.यावरून या विषयाचे महत्त्व अधोरेखित होते.तसेच सैनिकी स्कूल प्रवेशासाठी जी पुर्व परीक्षा घेतली जाते त्यातही या विषयाला 300 पैकी 50 गुण असतात.तसेच नवोदय विद्यालयातील प्रवेशासाठीच्या परीक्षेत एकूण 100 गुणांपैकी 50 गुण हे बुद्धीमत्ता या विषयासाठी आरक्षित असतात.

अनेक शाळांमध्ये बुद्धीमत्ता विषयाचे प्रशिक्षण अधिक परिणामकारक व्हावे म्हणून डिजिटल साधनांचा वापर होऊ लागला आहे.त्यात मोबाईल ॲप,व्हिडिओ क्लिप,AI आधारीत सराव चाचण्या,स्मार्ट बोर्ड आणि क्विझ प्रकारांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची रुची वाढवली जात आहे.काही ठिकाणी शिक्षक स्वतः उपक्रम विकसित करत आहेत.त्या उपक्रमशील अध्यापणामुळे विद्यार्थी या विषयाकडे केवळ पाठांतर म्हणून न पाहता त्यामागील तर्क,संदर्भ व उपयोजन समजून घेत आहेत.त्यामुळे केवळ शिष्यवृत्ती परिक्षेपूरते नव्हे तर त्यांच्या एकूण बौद्धिक विकासासाठी हे उपक्रम अत्यंत परिणामकारक ठरत आहेत.

**उपक्रमांची सुरुवात व गरज :-** सन 2000 नंतर शिक्षण पद्धतीत आलेल्या बदलांमुळे आणि विद्यार्थी परिक्षाभय वाढल्यामुळे शिक्षकांनी बुद्धीमत्ता विषय शिकवण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवायला सुरुवात केली.बुद्धीमत्ता हा विषय केवळ पाठांतरावर आधारित नसून विचार करण्याची क्षमता, निरीक्षण शक्ती आणि तर्क लावण्याची पद्धत यावर आधारित आहे.म्हणूनच या विषयाचे अध्यापन करताना केवळ पुस्तकांपुरते मर्यादित न ठेवता,विविध उपक्रम राबवणे आवश्यक ठरते.

**बुद्धीमत्ता विषयासाठीचे वेगवेगळे उपक्रम :-**

1) चित्रातून अर्थ लावणे.
2) आकृतीबंध पूर्ण करणे
3) तक्ते आणि तर्क शृंखला सोडवणे.
4) शाब्दिक कोडी व क्विझ सोडवणे.
5) चित्र रचना व विश्लेषण खेळ.
6) मांडणी व सादरीकरण उपक्रम.
7) मॉडेल,खेळणी आणि डिजिटल साधनांचा वापर.
8) संकल्पनात्मक मॅपिंग.
9) कार्ड गेम्स,फ्लॅश कार्डस,ब्रेन गेम.
10) डिजिटल ॲप व सॉफ्टवेअर चा वापर.

हे उपक्रम विद्यार्थ्यांचे संकल्पनात्मक ज्ञान वाढवतात आणि त्यांना स्वतंत्रपणे विचार करण्यास प्रवृत्त करतात.

**उपक्रमांची परिणामकारकता :-**

या उपक्रमांमुळे खालील सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत-:

1) परीक्षेतील घाबरटपणा कमी होतो.
2) प्रश्न सोडवण्याचा वेग आणि अचूकता वाढते.
3) विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षण, विश्लेषण आणि निर्णय क्षमता वाढते.
4) शिष्यवृत्ती परीक्षेतील निकालांमध्ये वाढ होते.
5) विद्यार्थ्यांचे संपूर्ण बौद्धिक व भावनिक विकास साधला जातो.
6) विचारशक्ती व विश्लेषण क्षमतेत वाढ होते.
7) समस्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो.
8) स्वतंत्र विचार करण्याची सवय लागते.
9) प्रश्न सोडवण्याचा आत्मविश्वास वाढतो.
10) शिष्यवृत्ती परीक्षेतील यशाचे प्रमाण वाढते.

अनेक शाळांमध्ये या उपक्रमांच्या साहाय्याने गुणवत्तेचे प्रमाण १५% ते २५% पर्यंत वाढले आहे.

**निष्कर्ष :-**

बुद्धिमत्ता विषय हा शिष्यवृत्ती परीक्षेचा केंद्रबिंदू आहे. या विषयाच्या उपक्रमशील अध्यापनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, तर्कशक्ती आणि समस्या सोडवण्याची कला विकसित होते. शिक्षणाच्या नव्या युगात ही तयारी फक्त परीक्षेसाठी नव्हे तर जीवनासाठी उपयोगी ठरते.उपक्रम आधारित शिक्षणपद्धतीमुळे बुद्धिमत्ता विषय अधिक परिणामकारक ठरतो आहे. विद्यार्थ्यांचे केवळ परीक्षेतील गुणच नव्हे, तर जीवनात उपयोगी पडणारी विचारशक्ती विकसित होते. म्हणूनच या उपक्रमांचे महत्त्व ओळखून, सर्व शाळांनी नियमितपणे व योजनाबद्ध पद्धतीने हे उपक्रम राबवले पाहिजेत.

**संदर्भसूची :-**

1. बापट ,भा.गो .(1975). शैक्षणिक संशोधन. पुणे: नूतन प्रकाशन
2. भिंताडे वि.रा. (1994) शैक्षणिक संशोधन पद्धती. पुणे: नूतन प्रकाशन
3. देशपांडे प्रकाश आणि पाटोळे एन. के. (1994) संशोधन पद्धती , य.च.म.मु.वि.नाशिक
4. मुळे रा.श.आणि उमाठे, वि.तू.(1977) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे. नागपूर: महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ
5. प्रधान हेमचंद्र (2004) , विज्ञान शिक्षण नव्या वाटा , ग्रंथालाय प्रकाशन , मुंबई.
6. तांबे चं.तु. (2010), शिक्षण तरंग , वर्ष दुसरे , अंक 7 वा , इनसाईट प्रकाशन , नाशिक